शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विविध अनुदानाचे वाटप करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून वर्धा जिल्ह्यात हे अनुदान सर्व लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची योजना राबविण्यात आली. आधार कार्डशी जोडणी करून सर्व लाभार्थ्यांना अनुदान वाटपाची प्रक्रिया संपुर्ण पारदर्शकपणे झाली. देशात पहिला क्रमांक मिळविण्याचा मान या जिल्ह्याला प्राप्त झाला तसेच महाराष्ट्र शासनाचा ई-गव्हर्नन्स पुरस्कार प्राप्त झाला आहे. या प्रकल्पाची माहिती मराठीतून राज्यातील सर्वसामान्य नागरीकांपर्यंत पोहंचवीण्याचे काम श्री सुनिल पोटेकर यांच्या या पुस्तकाद्वारे निश्चितच होईल असे मला वाटते. श्री सुनिल पोटेकर यांचे या स्तुत्य उपक्रमाबद्दल अभिनंदन आणि शुभेच्छा..!

-एस नवीन सोना, जिल्हाधिकारी, वर्धा

---

ई-गव्हर्नन्सच्या महाराष्ट्राच्या विविध स्तरावर काम करीत असलेल्या अनेकानेक उत्तम वेबसाईटचे दर्शन आम्हाला महाराष्ट्र शासनाच्या स्पर्धेत बघावयास मिळाले. महाराष्ट्र शासनाची ही स्पर्धा म्हणजे जणु ज्ञानसंवर्धनाचीच खून होती. या सर्व वेबसाईट्ची थोडक्यात माहिती एकत्रित स्वरूपात ग्रंथरूपाने प्रकाशित करून सुनिल पोटेकर यांनी मोलाची कामगिरीबजावली आहे. हा माहितीचा खजिना प्रत्येक मराठी मानसाजवळ असायला हवा. सुनिल पोटेकरांचे मनापासून अभिनंदन !

- डॉ. विजया वाड,

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

---

महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या 'महापारेषण' कंपनीने वर्ष २००९ मध्ये परिवर्तन प्रकल्पाची घोषणा करत ERP (SAP) प्रणालीची मुहुर्तमेढ रचून संपूर्ण महाराष्ट्रात सन २०१२ पासून यशस्विरित्या कार्यान्वीत केली. या प्रकल्पाची तसेच पुरस्कार विजेत्या सर्व प्रकल्पांची संपुर्ण माहिती मराठी भाषेत सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न श्री सुनिल पोटेकर यांच्या या पुस्तकाच्या माध्यमातून होत आहे. इतर विभागांनी सुद्धा या प्रणालीची माहिती घेऊन तिचा वापर करण्याबाबत विचार करावा. वाचकांना महापारेषण कंपनीतर्फे शुभेच्छा...!

- एस टी शिंदे,

मुख्य अभियंता, मासंवि, मुंबई.

---

महाराष्ट्र शासनाच्या संचलनालय, लेखा व कोषागारे विभागाच्या वेतनिका, ट्रेजरी नेट आणि आयएफएमएस-एकात्मिक वितीय व्यवस्थापन प्रणाली प्रकल्पांची माहिती पुस्तकरुपाने प्रसिद्ध केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन! महाराष्ट्र शासनाच्या लोकाभिमुख योजना सोप्या भाषेत पोहचविण्याचा 'महा ई-गव्हर्नन्स' हे पुस्तक म्हणजे सुरेख प्रयत्न आहे. श्री सुनिल पोटेकर यांच्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा..!

- स.अ.मु.नकवी

संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | घराघरात विश्वकोश | १७ |
| २. | आय-सरिता | २१ |
| ३. | कॉलीस-जिल्हाधिकाऱ्याची माहीती प्रणाली | २५ |
| ४. | अपंगत्वाचे विश्लेषणासाठी सॉफ्टवेअर महाराष्ट्र (स.अ.ड.म) | ३० |
| ५. | महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे रचनांतरण | ३३ |
| ६. | ई-परवाना | ३६ |
| ७. | आशा | ३९ |
| ८. | IFMS - Integrated Financial Management System | ४१ |
| ९. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे 'परिवर्तन' | ४५ |
| १०. | वेतनिका | ४८ |
| ११. | ट्रेजरी नेट (आवृत्ती-३) | ५० |
| १२. | ई-रिक्रुटमेन्ट | ५३ |
| १३. | वाळू-रेती घाटांसाठी ई-टेंडर आणि ई-ऑक्शन | ५६ |
| १४. | म्हाडा लॉटरी - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण | ५८ |
| १५. | राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना | ६१ |
| १६. | संगणकीय ग्रामिण महाराष्ट्र प्रणाली – संग्रामसॉफ्ट | ६४ |
| १७. | आधार कार्डनुसार थेट लाभार्थ्यांना विविध योजनांचा फायदा | ६७ |
| १८. | ई-मोजणी | ६९ |
| १९. | ई-सेतू | ७२ |
| २०. | महान्युज | ७४ |
| २१. | मराठी भाषा विभागाचे संकेतस्थळ | ७७ |
| २२. | साखर आयुक्तालय यांचे संकेतस्थळ | ८० |
| २३. | गट शिक्षण अधिकारी यांचे संकेतस्थळ | ८५ |
| २४. | सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाचे संकेतस्थळ | ८७ |
| २५. | आरोग्य सल्ला संपर्क केंद्र | ९० |
| २६. | साखर कारखान्यांकडून उत्पादनाची पुल एसएमएसमार्फत घेणे | ९२ |
| २७. | पुनर्रचित गतिमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रम | ९४ |
| २८. | विश्वास | ९७ |
| २९. | ऑनलाईन सोसायटी लेखापरिक्षण प्रणाली | ९९ |
| ३०. | ई-ऑफीस | १०१ |

# १७. आधार कार्ड नुसार थेट लाभार्थ्यांना विविध योजनांचा फायदा डायरेक्ट बेनेफिट ट्रान्स्फर (डीबीटी)

भारतातील प्रत्येक नागरिकास त्यांना रहिवासाचा विशिष्ट असा ओळख क्रमांक असावा या उद्देशाने कार्यरत असलेल्या आधार योजनेचे फलस्वरूप म्हणून विविध योजनांच्या लाभार्थ्यांना त्यांच्या आधार ओळखक्रमांकानूसार ओळखून त्यांच्या हक्काचे विविध लाभ थेट त्यांच्याच हातात पडत आहेत. आधार या योजनेमूळे संपूर्ण देशामध्ये या ओळखक्रमांकामुळे प्रत्येक नागरिकास ओळखणे शक्य झाले आहे. ९३% पेक्षा जास्त आधार नोंदणी साध्य करण्यात यशस्वी झालेल्या वर्धा जिल्ह्याने एनएसपी फ्युचरटेक प्रा. लिमीटेड या संस्थेच्या मदतीने विविध शासकीय योजनांचा फायदा थेट लाभार्थ्याला मिळण्याच्या संकल्पनेतून संगणक प्रणालीद्वारे या योजनांच्या लाभार्थ्यांच्या आधार कार्डची जोडणी करण्यात आलेली असून बँकेच्या मदतीने त्या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या लाभाचा थेट फायदा करून देण्यात आलेला आहे. या योजनेला 'डायरेक्ट बेनेफिट ट्रान्स्फर' (डीबीटी) असे म्हटले जाते. स्वयंस्फुर्तीने अशाप्रकारची योजना समर्थपणे यशस्वी करणारा हा भारतातील पहीलाच जिल्हा आहे.

स्वयंपाकाच्या गॅसवरील अनुदान योजना, अनुसुचीत जाती, जमाती आणि भटक्या विमुक्त जमातीच्या विद्यार्थ्यांसाठीची पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना, मॅट्रीकपूर्व विद्यार्थ्यांसाठीची शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना, जननी सुरक्षा योजना, राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना, केरोसीन अनुदान योजना, खत खरेदीवरील अनुदान योजना आणि महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनांच्या लाभार्थींची आधार नोंदणी १००% असल्याची खात्री करून त्या सर्व लाभार्थींचे बँक खाते निर्माण करून आधारच्या डाटाबेसशी जूळवणी करण्यात आली. प्रत्येक योजनांच्या लाभार्थी आणि त्यांचे आधार ओळखपत्र क्रमांक यांची सांगड घालून त्याची जोडणी प्रत्यक्ष बँक खात्याशी करण्यासाठी एनएसपी फ्युचरटेक प्रा. लिमीटेड या संस्थेमार्फत संगणक प्रणाली विकसित करण्यात आली. 'मासटेक' संगणक प्रणाली द्वारे ऑनलाईन पद्धतीने शिष्यवृत्ती योजनेतील लाभार्थ्यांची आधारशी जोडणी करण्याची नाविन्यपुर्ण उपक्रम वर्धा जिल्ह्याने राबवील्यानंतर त्याच पद्धतीनी देशात अन्य भागात हीच पद्धत अवलंबविण्यात आली. गॅस धारकांसाठी 'ड्रॉप बॉक्स' ही संकल्पना अंमलात आणून ग्राहकांच्या आधार क्रमांकाची माहिती मिळविण्यात आली.

राष्ट्रियकृत बँकांच्या सहाय्याने दहा वर्षावरील मुलांसहीत सर्वांचे बँक खाते तयार करून ते आधार कार्डला संलग्न करण्यात आले. तसेच सर्व लाभार्थ्यांचे आधार संलग्न मायक्रो एटीएम कार्ड प्राप्त करून घेण्यात आले. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत आशा स्वयंसेविकांच्या मदतीने लाभार्थ्यांशी संपर्क करून त्यांची माहिती संकलीत करण्यात आली. लाभार्थ्यांच्या सोईसाठी जिल्ह्यात अतिरीक्त ए.टी.एम. स्थापीत करण्यात आले. या योजनेअंतर्गत वर्धा जिल्ह्यात १४३ बँक प्रतीनिधींच्या मदतीने १०१३४२ राष्ट्रीयकृत बँकेत नवीन बचत खाते उघडण्यात आले.




या योजनेचा थेट फायदा देत विविध योजनेच्या २९५००० लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम पेमेन्ट गेटवेच्या माध्यमातून ८.५ करोड रूपये रक्कम जमा करण्यात आली आहे. या प्रकल्पामूळे अनुदान वाटप प्रक्रीयेत तत्परता आणि पारदर्शकता आल्यामूळे सामान्य नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढला आहे.

✖ ✖ ✖ ✖